आपण हा लेख www.maanavta.com या अध्यात्मिक वेबसाईट वर वाचत आहात.

संपादकीय

कुठल्या बाजुला जायायचे ?

लेखक – श्री. राम कुमार 'सेवक' जी मुख्य संपादक – www.maanavta.com

काही दिवसापूर्वी एका व्यक्तीच्या दुर्व्यवहार मला खुप दु:खी करून गेला. जो खुपच दुदैवपूर्ण जाणवला, मलाच नव्हे तर माझ्या अन्य सहकर्मीयांना सुध्दा, तरी सुध्दा मी काहीही विरोध करू शकलो नाही. मनोबुध्दीवर निरंकारी बाबाजींच्या त्या श्रीवचनांचा पगडा होता की, आम्ही तर Realised Soul आहेत, अर्थात जो, अनुभूतियुक्त आत्मा आहे, त्याने आपल्या जिवन व्यवहारात या गोष्टीं (बाबीं) लक्षात ठेवायला हव्या.

वरील दुर्व्यवहारासंबधी ज्याच्याशी ही थोडीशी चर्चा झाली तो सांगत होता की, ''तो व्यक्ती तर आहेच चुकीचा, त्याने तुमचा अपमान केला आहे त्याकरीता त्याला प्रतीउत्तर द्यायलाच हवे'' तुम्ही त्याचा तो दुर्व्यवहारही विसरले जो त्याने दहा–पंधरा वर्षाअगोदर केला होता. तो तर त्यापेक्षाही जास्त खेदजनक होता.

मला सुध्दा ही बाब योग्य वाटली, कारण खरोखर त्याचा जुने खेदजनक वर्तन मी विसरलो होतो. त्या दृष्टीने तर खरोखर मी विरोध करायला हवा होता. आता मात्र मी सदगुरू बाबाजीची अनुभूतियुक्त आत्माची दिशा विसरून सहकर्मीयांची ''जश्यास तसे'' वाले विचारांशी सहमत झालो होतो.

दुसऱ्या दिवशी मी योजना बनवली की, ज्यायोगे त्याला सडेतोड उत्तर देणार होतो. जर तो मला असे म्हणाला तर विरोधात मी त्याला असे बोलणार, त्याच्या सोबत भविष्यात कुठलीही भागीदारी करणार नाह. इथपय ंत की कमाल मर्यादेपर्यंत पोहचण्याची क्लुप्तीसुध्दा मी तयारी करून घेतली. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्याच्याशी भांडणासाठी मी एक जाळे विणुन घेतले होते.

या घटनेला होऊन आठवडा उलटला होता. बऱ्याच विचारांती सुध्दा त्या व्यक्ती सोबत आजपर्यंत कुठलाही विवाद करू शकलो नाही.

विणलेल जाळे तसेच राहुन गेले. सर्व योजना (क्लुप्ती) तशाच्या–तशाच राहुन गेल्या कारण असे बरेच कार्य करायचे होते जे विवाद (तंठा) वाढवण्यापेक्षा जास्त महत्वपूर्ण होते.

प्राथमिकतेच्या क्रमतालीकेत त्या तंठयाचे स्थान खुपच खाली होते. आत तर तो तंठा (विवाद) जास्त आठवतही नाही कारण या विषयांत माझी स्मरणशक्ती काहीसी दुर्बल आहे.

हे सर्व ऐकवण्याचा माझा अर्थ इतकाच आहे, होऊ शकते की तुमच्या सोबत सुध्दा कधी–कधी असे होत असेल. विठेला प्रतीउत्तर दगडाने देण्याची इच्छा होत असेल, हे अशक्य नाही. कुणाशी प्रेमाचा तर कुणाशी द्वेषाचा हा मार्ग आजचा नाही. या परिस्थितीत कसे वर्तन (वागावे) करावे या संबधी महात्मा गांधींनी सांगितले होते की चांगले काम करण्यास कधीही उशीर करायला नको, त्यास लगेच करून टाका, आणि नकारात्मक (वाईट) कामास नेहमी उद्यावर ढकलत जा.

या विषयी हा एक प्रसंग लक्षात येतोय.

एकदा अब्राहम लिंकनांच्या एका मंत्र्याने त्यांच्याजवळ एका व्यक्तीची खुप अवहेलना केली. लिंकनांनी मंत्र्यास सांगितले की, तुझे हे मत (भाव) एका कागदावर लिहुन त्याला पाटवुन दे. हे ऐकुन मंत्री महाशय आपले ते नकारात्मक विचार लिहायला बसले. ज्यावेळी त्यांनी लिखान पूर्ण केले ते लिंकनांना बोलले की कागदास आता पाठवुन देऊ? लिंकन त्यांना म्हटले की, पुन्हा एकदा हे वाचा, मंत्र्याने पुन्हा ते वाचले, आता त्यांची मनस्थिती बदलेली होती. अंतरातील द्वेष आता त्या कागदावर येऊन गेला होता आणि ते आता स्वत:स शांत अनुभव करीत होते. आता लिंकनांनी स्वत: तो कागद वाचला आणी म्हणाले ''याला पाठवणार?'' मंत्री बोलले,

'तुम्ही जसे सांगाल. लिंकन म्हणाले की, पूर्ण द्वेष या कागदावर येऊन गेला आणि याकरीता याला आता केराच्या टोपलीत फेकुन द्या.

बर्लीनची भिंत जेव्हा जमीनदोस्त केली गेली, त्यावेळी त्या ठिकाणी कुणी लिहले होते की, हे जग भिंतीसाठी खुपच छोटे आहे.

कुठलीही भिंत जी दुरावा निर्माण करते ती द्वेषानेच सुरू होते. निरंकारी बाबा जी आपल्या प्रवचनात सांगतात की,

''एक उम्र भी कम है मोहब्बत के लिए
लोग वक्त कैसे निकाल लेते है नफरत के लिए।''

नेहमी आम्ही गप्पा प्रेमाच्या करतो, परंतु ज्यावेळी निवड करण्याची वेळ येते त्यावेळी आम्ही द्वेषाच्या पक्षाला जाऊन मिळतो, कारण आमचा अहंकार आम्हास त्याच दिशेने घेवुन जातो.

अशा परिस्थितीत पर्याय हाच असतो की, आम्ही अनुभूतियुक्त आत्मासारखा व्यवहार करावा किंवा बहुमताचा सल्ला मानुन तणाव निर्माण करण्याचे मनसुभे रचायचे. त्या मंत्र्याचा व्यवहार (वर्तन) अनुभूतियुक्त आत्मासारखा याकरीता होऊ शकला, कारण त्याची सोबती अब्राहम लिंकनांच्या सोबत होती जे खुप महान व्यक्तीमत्व होते.

माणसाने नेहमी महान व्यक्तींचाच संग (सहवास) करावा, ज्याकारणे आम्ही योग्य पक्षाची निवड करण्यात चुक करणार नाही.

प्रश्न हा आहे, आम्ही निवड कुणाची करतो? अध्यात्मीक मार्गास (शांतीपूर्ण संभाषण) निवडतो की विवादास? वैरास निवडतो की शांतीस? द्वेषास निवडतो की प्रेमास? निवड आमची स्वत:ची आहे आणि परिणाम त्यानुसारच ठरलेला आहे.

होऊ शकते की, कुठल्या परिस्थितीत प्रेमाच्या बदल्यात प्रेम मिळतही नसेल, (कारण) फुलास एखाद्या व्यक्तीने चिखलात फेकुन दिले तर त्याचे सर्व गुण चिखलाच्या प्रभावाने निरर्थक वाटतात, तरी सुध्दा ते चिखलासोबत चिखल होत नाही, राहणार मात्र फुलच.

त्या अवस्थेत, ज्यावेळी प्रेमाच्या मोबदल्यात प्रेम मिळत नाही, त्यावेळी हृदयास ही शांती तर लाभेल की, मी आपल्या गुरूच्या वचनांचे पालन तर करतच आहे. याचा अर्थ हाच की मला त्यांची कृपादृष्टी लाभेलच.

ही शांती मत्सराच्या तणावापेक्षा लाखपटीने चांगली. गुरू–पीर–पैगंबर, संत महत्मा आजपर्यंत जनमानसाच्या हृदयात जिवंत आहे, कारण त्यांची निवड योग्य होती. त्यांची बुध्दीमत्ता (चेतनावस्था) नेहमी जागृत होती, त्याकरीता कुणाच्याही गोष्टीत न पडता त्यांनी Realised Soul (अनुभूतीयुक्त आत्मा) सारखे वर्तन केले.

जिवनात पाऊलो–पाऊली चकवणारे रस्ते येतील, द्वंद होणार कि कुठल्या बाजुला जायायचे? त्यावेळी गोंधळण्याची दाट शक्यता असते. त्यावेळी बुध्दी–चेतनतेची आवश्यकता पडते.

दृढनिश्चयाने योग्य मार्गावर पाऊल पुढे टाकले जावे, अनुभूतियुक्त आत्मासारखे, वर्तन केले जावे ज्याने संतोषधनाची प्राप्ती अर्थात मानवी जिवनाची सफलता सुनिश्चित आहे.

राम कुमार 'सेवक'
rksewak@yahoo.co.in

अनुवादक
सुकदेव पाटील
sukdeo_behere@yahoo.co.in